महाराष्ट्र शासन
## महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक :- ०२/५१२३/२०२०/१५** **दिनांक : १५ जून, २०२२**

### -: घोषणा :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ३० डिसेंबर, २०२० व दिनांक २७ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या घोषणांव्दारे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला, "आयोगामार्फत घेण्यात येणा-या विविध स्पर्धा परीक्षांस बसणाऱ्या उमेदवारांचे प्रयत्न / संधीची संख्या मर्यादित करण्याबाबतचा आयोगाचा निर्णय" या घोषणेव्दारे रद्द करण्यात येत आहे.

२. त्याअनुषंगाने ज्या त्या प्रवर्गातील/ वर्गवारीतील उमेदवारांना वयोमर्यादेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून संधी अनुज्ञेय राहतील.

**सचिव**
**ठिकाण : मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**MPSC साठी 2021 पासून Attempts Limit चालू केले होते.**
**ते रद्द करण्यासबंधीतची 2022 मधील घोषणा**

**@mpscmaterial**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक:- ०२/५१२३/२०२०/१८ दिनांक: ३० डिसेंबर, २०२०

# -: घोषणा :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विभिन्न शासकीय पदांसाठी सुयोग्य उमेदवारांच्या शिफारशी संदर्भात राबविण्यात येणा-या निवडप्रक्रियामध्ये वेळोवेळी करावयाच्या विविध सुधारणात्मक उपाययोजनांपैकी एक म्हणजे स्पर्धा परीक्षांस बसणाऱ्या उमेदवारांचे प्रयत्न / संधीची संख्या मर्यादित करणे, याबाबत आयोगाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे:-

**(अ)**आयोगामार्फत आयोजित होणाऱ्या विभिन्न स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेणाऱ्या उमेदवारांस संधीची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे:-

(१) खुला (अराखीव) उमेदवारांस कमाल **सहा** संधी उपलब्ध राहतील.

(२) अनुसुचित जमाती व अनुसुचित जाती प्रवर्गातील उमेदवारांस कमाल संधीची मर्यादा लागू राहणार नाही.

(३) उर्वरित मागास प्रवर्गातील उमेदवारांस कमाल **नऊ** संधी उपलब्ध राहतील.

**(ब)** उमेदवारांची संधीची संख्या खाली नमूद केल्यानुसार लागू राहतील:-

(१) उमेदवाराने पूर्व परीक्षेत भाग घेतल्यास, ही संबंधित स्पर्धा परीक्षेची संधी समजली जाईल.

(२) एखादा उमेदवार पूर्व परीक्षेच्या कोणत्याही एका पेपरसाठी उपस्थित राहिल्यास, त्याची ती संधी समजली जाईल.

(३) उमेदवार कोणत्याही कारणास्तव परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरल्यास किंवा त्याची उमेदवारी रद्द झाल्यास तरीही त्याची परीक्षेस उपस्थिती संधी गणली जाईल.

**२.** परीक्षेच्या कमाल संधीबाबतचा आयोगाचा प्रस्तुत निर्णय सन २०२१ मध्ये प्रसिध्द होणा-या जाहिरातीस अनुसरुन आयोजित परीक्षांपासून लागू करण्यात येईल.

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई

**MPSC साठी २०२१ पासून Attempts Limit चालू केले होते. ते २०२२ पासून रद्द केलेले आहेत. पूर्वी सारखे वयोमर्यादा असेपर्यंत कितीही वेळा परीक्षा देता येईल.**


**@mpscmaterial**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial